08-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/8/2025 12:35 AM Page 1



## निवडक

### सावईवेरे येथील श्री लक्ष्मी देवीचा नूतन मूर्ती प्रतिष्ठापनेचा १० रोजी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. ७ :** वेलकास – सावईवेरे येथील श्री लक्ष्मी देवी पुन: नूतन मूर्ती प्रतिष्ठापनेचा दुसरा वर्धापनदिन सोहळा शनिवार दि. १० रोजी विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्त सकाळी १० वाजता सत्यनारायण महापूजा, अभिषेक, दुपारी १२.३० वाजचा आरती, तीर्थप्रसाद, १ वाजता महाप्रसाद, संध्याकाळी ६ वा. स्थानिक कलाकारांचे भजन, १० वाजता 'तश्याक तशें' हा कोंकणी नाट्यप्रयोग होणार आहे. तरी सर्व भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

---

### ओम कला सांस्कृतिक केंदातर्फे ११ रोजी पेडणे तालुका लोकनृत्य स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** हळर्ण, पेडणे येथील ओम कला सांस्कृतिक संघ आयोजित लोकनृत्य स्पर्धा रविवार दि. ११ रोजी सायंकाळी ४ वाजता श्री सातेरी मंदिर हळर्ण येथे (गोव्यातील कुठलाही नृत्य प्रकार) आयोजित करण्यात आली आहे.

प्रथम पारितोषिक ५,००० व फिरता चषक चषक, द्वितीय ३,००० व चषक, तृतीय पारितोषिक २,००० व चषक, प्रथम उत्तेजनार्थ १,५०० व चषक, द्वितीय उत्तेजनार्थ १,००० व चषक ही स्पर्धा पुरस्कृत अ‍ॅड. महेश्वर (मयुर) आनंद परब (माजी सरपंच आणि विद्यमान पंच सदस्य हळर्ण यांनी केली आहे.

बाकीच्या सहभागी पथकाला ५०० + सन्मानचिन्ह देण्यात येतील. (फक्त १० पथकांना प्रवेश दिला जाईल) अधिक माहितीसाठी संपर्क मकरंद परब : ८९९९३२०९२३ राज परब : ९२८४७९९४७२ साधावा.

---

### पेडणेतील सुशिक्षित बेरोजगारांनी परीक्षेची तयारी करावी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** गोवा राज्य कर्मचारी भरती आयोगातर्फे ३९८ पदांच्या भरतीची घोषणा सरकारने केली आहे. या घोषणेचे मिशन फॉर लोकल, पेडणेचे संस्थापक राजन कोरगांवकर यांनी स्वागत केले आहे. पेडणे मतदारसंघ तथा तालुक्यातील पात्र सुशिक्षित बेरोजगारांनी या पदांसाठी अर्ज दाखल करावेत. परीक्षेची तयारी तथा ऑनलाईन अर्ज दाखल करण्यासाठी मिशनच्या पेडणे कार्यालयातर्फे मदत केली जाईल,अशी माहिती राजन कोरगांवकर यांनी दिली. पेडणे मतदारसंघ हा राखीव असला तरी इथे मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेरोजगार आहेत.

दुर्दैवाने सरकारी नोकऱ्यांसाठी पैसे द्यावे लागत असल्यामुळे हे बेरोजगार नोकऱ्यांपासुन वंचित आहेत. खाजगी क्षेत्रात त्यांच्या पात्रतेची थट्टा करून त्यांना कंत्राटी पद्धतीवर राबवले जात आहे. गोवा कर्मचारी भरती आयोगामार्फत पात्रता आणि गुणवत्तेवर आधारित भरती होईल,अशी अपेक्षा आहे आणि त्यामुळे पेडणेतील सर्व पात्र उमेदवारांनी या पदांसाठी अर्ज दाखल करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजन कोरगावकर यांनी केले. ऑनलाईन अर्ज दाखल करण्यासह परीक्षेच्या तयारीसाठी तसेच परीक्षेसाठीच्या मार्गदर्शनाची सोय मिशन फॉर लोकल, पेडणेतर्फे करण्याचे प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितेल.

पात्रता आणि गुणवत्ता पेडणेतील युवापिढीत भरभरून आहे परंतु भ्रष्ट व्यवस्थेमुळे बेरोजगारांत नैराश्य पसरले आहे. या युवकांत नवचैतन्य निर्माण करून त्यांना त्यांच्या ताकदिची ओळख करून देण्यासाठीच मिशन फॉर लोकल, पेडणे ही संस्था कार्यरत आहे. पेडणेतील तमाम सुशिक्षित पात्र बेरोजगारांनी पुढे येऊन या संधीचा लाभ घ्यावा,असेही कोरगांवकर म्हणाले.

---

### पेडणे तालुका गोमंतक भंडारी समाजाची सभा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ७ :** पेडणे तालुका गोमंतक भंडारी समाजाची सभा नुकतीच श्री महाकाळ मंदिर, मधलामाज, मांद्रे येथे समाजाचे अध्यक्ष शिवकुमार आरोलकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

यावेळी समाज संस्थेचे सरचिटणीस दत्ताराम नाईक यांनी मागील सभेचा वृतांत सभेपुढे मांडला व सभेने त्यास एकमताने मंजुरी दिली. यानंतर पहलगाम येथील दहशदवादी हल्ल्यात मरण पावलेल्या नागरिकांना आणि श्री लईराई जत्रेत चेंगराचेंगरीत मरण पावलेल्या नागरिकांना आणि भंडारी समाजाचे एक प्रमुख कार्यकर्ते डॉक्टर अनंत नाईक यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करून सर्वांना एक मिनिट मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

या सभेत १३ एप्रिलच्या स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाच्या जमाखर्चास मान्यता देण्यात आली. यावेळी यंदाचा विद्यार्थी गुण गौरव व पुरस्कार प्रदान सोहळा जुलै २०२५ मध्ये समाजाच्या एकविसाव्या वर्धापनदिनी आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेत सर्वश्री श्रीधर मांजरेकर, मनोहर म्हामल, अनिल म्हामल, प्रशांत हरमलकर, सोनू म्हामल, यशवंत पेडणेकर यांनी भाग घेतला.

दरम्यान केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचे जाहीर केल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानणारा ठराव मंजूर करण्यात येऊन जातनिहाय जनगणना लवकर करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थी गुणगौरव व पुरस्कार प्रदान सोहळ्याचा सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येईल असे अध्यक्ष शिवकुमार आरोलकर यांनी सांगितले. सचिव अनिल म्हामल यांनी शेवटी आभार व्यक्त केले.

---

### धारागळ येथील देव दाड पंचायतनचा पुनः प्रतिष्ठापना सोहळा सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** दाडाचीवाडी धारागळ येथील श्री देव दाड पंचायतनचा पुनः प्रतिष्ठापना सोहळा बुधवार दि. ७ मे ते शुक्रवार ९ मे पर्यंत मोठया उत्साहात साजरा होणार आहे. त्या निमित्त सकाळी ८.३० वाजता शांती पाठ ,श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन,देवता प्रार्थना, मात्रुका पूजन, नांदीश्राद्ध, प्राकार शुद्धी, शांतीहोम, मंडप स्थापना, जलाधी वास, स्नान विधी,असा धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. दि. ८. रोजी सकाळी ८.३०.वाजता मंडप देवता पूजन,मधूपर्क पूजा,देवता स्थापना, ग्रह यजन,मुख्य होम,तत्व न्यास होम, पिंडिका अधिवास, धान्य अधिवास, शय्या धिवास,आरती, मंत्र पुष्प, तीर्थप्रसाद होईल दि. ९ रोजी सकाळी ८.३० वाजता प्राकार शुध्दी मंडप देवता पूजन,तुलसी उद्यापन, दीपस्तंभ उद्यापन व सकाळी ९.४९ वाजता श्री देव दाड व परिवार देवता पुनः प्रती स्थापना कार्यक्रम होईल. या वेळी तत्वन्यास, प्राणप्रतिष्ठा, महापूजा,पुजांग होम,बलिदान, पूर्णाहुती, महाआरती, गाऱ्हाणे, महा नेवेद्य, ब्राम्हण संतर्पण, दक्षिणा दान, आशीर्वाद, तीर्थ प्रसाद,व महा प्रसाद,हा कार्यक्रम होईल. दुपारी व रात्री महाप्रसाद होईल. संध्याकाळी ७ वाजता सुहासिनीतर्फे जोडवी प्रज्वलनचा कार्यक्रम होईल. या संपूर्ण कार्यक्रमाचे पुरोहित यजमान म्हणून श्री उज्वल हळबे धारगल आणि मार्गदर्शक म्हणून बांदा येथील श्री मंगेश मोर्ये उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दि. १० मे ते २१ मे पर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रम ज्या मध्ये स्थानिक नाटके, ऑर्केस्ट्रा, दशावतारी नाटके, भजन, तसेच भावगीत, भक्ती गायनाचा समावेश असेल. या सर्व कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे श्री देव दाड देवस्थान समिती तर्फे कळविण्यात आले आहे.

---





# ऑपरेशन अभ्यास अंतर्गत दक्षिण गोव्यात 'मॉक ड्रिल'

## आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणांची झाली चाचणी | समन्वय आणि नागरी संरक्षण तयारीचे मूल्यांकन

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** दक्षिण गोवा जिल्हा प्रशासनाच्या वतीने बुधवारी ऑपरेशन अभ्यास या नावाने एक बहुप्राधिकरणीय आणि उच्च तीव्रतेचे मॉक ड्रिल राबवण्यात आले. या सरावाद्वारे जिल्ह्याच्या आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद क्षमता, विविध यंत्रणांमधील समन्वय आणि नागरी संरक्षण तयारीचे मूल्यांकन करण्यात आले.

हा सराव जिल्ह्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा असलेल्या क्षेत्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता. हवाई हल्ला, स्फोट, आग, इमारती कोसळणे आणि रासायनिक गळती यांसारख्या कृत्रिम संकटांची नाट्यमय पुनर्रचना करून यंत्रणांच्या तयारीची कसोटी पाहण्यात आली.

दुपारी चार वाजता पोलिस नियंत्रण कक्षाकडून मॉक अलर्टच्या माध्यमातून हवाई हल्ल्याची सूचना देण्यात आली. यानंतर रेल्वे, औद्योगिक विभाग, आयओसीएल, शिक्षण संस्था आणि जलसंपदा विभागांमध्ये आपत्कालीन सायरन वाजवले गेले. नागरिक संरक्षण स्वयंसेवक आणि गृहरक्षक दलाचे जवान तत्काळ तैनात करण्यात आले.

या सरावात तीन मुख्य ठिकाणी सिम्युलेशन करण्यात आले. दाबोळी विमानतळावर एअर स्ट्राइकमुळे आग आणि इमारत कोसळण्याची परिस्थिती तयार करण्यात आली, तर वास्को येथील आयओसीएल टर्मिनलवर धोकादायक रसायन गळती आणि आग निर्माण केली गेली. मडगाव रेल्वे स्थानकावर देखील इमारत कोसळल्याचे आणि आग लागल्याचे नाट्य सादर करण्यात आले, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर जीवितहानी व सार्वजनिक वाहतूक विस्कळीत झाल्याचा आभास निर्माण करण्यात आला.

या तिन्ही ठिकाणी पोलिस, अग्निशमन दल आणि जिल्हा प्रशासनाच्या देखरेखीखाली लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचा सराव करण्यात आला. विविध यंत्रणांच्या गणवेशधारी कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती केली.

मडगाव येथील ईएसआय रुग्णालयात तात्पुरते वैद्यकीय मदत शिबिर उभारण्यात आले. या शिबिरात आपत्कालीन परिस्थितीत आरोग्य सुविधा तात्काळ उपलब्ध करण्याच्या क्षमतेची चाचणी घेण्यात आली. या मॉक ड्रिलचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे संध्याकाळी ७.३० ते ७.४५ या वेळेत विविध ठिकाणी समन्वित ब्लॅकआउट राबवण्यात आला. मुरगाव नगरपरिषद हद्दीतील आयओसीएल टर्मिनल परिसर, दाबोळी विमानतळाभोवतीची गावे, चिखली , सांकवाळ , मडगाव रेल्वे स्थानक परिसर, बस स्थानक, नावेली व आके या भागात विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला.

ब्लॅकआउट काळात वाहतूक सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यायी मार्ग वळवण्यात आले. तसेच आपत्कालीन हॉटलाइन सेवा व रेडिओ संप्रेषण प्रणाली सक्रिय करण्यात आल्या, ज्यामुळे विविध यंत्रणांमध्ये तत्काळ समन्वय साधता आला. या सर्व सरावाचे केंद्रीय नियंत्रण दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा आपत्कालीन ऑपरेशन्स सेंटर मधून ठेवण्यात आले. जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पोलिस अधिकारी, आरोग्य, अग्निशमन व वाहतूक विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सरावानंतर जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांनी सांगितले की, ऑपरेशन अभ्यास हा दक्षिण गोव्याच्या एकत्रित आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेची तपासणी करण्यासाठी एक महत्त्वाचा उपक्रम होता.

विविध एजन्सींच्या समन्वयामुळे आणि जनतेच्या सहकार्यामुळे हा सराव यशस्वी झाला. अशा सरावामुळे आपल्यात लवचिकता निर्माण होते आणि प्रत्यक्ष आपत्तीला सामोरे जाण्याची तयारी होते. जिल्हा प्रशासनाने सहभागी विभाग, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांचे सहकार्याबद्दल आभार मानले. यापुढील काळात अशाच प्रकारच्या सरावांचे आयोजन करून आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

---

# ताळगाव मध्ये पुन्हा आग : शेतीचे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ७ :** ताळगावमधील कामराभाट येथील कोरड्या गवताच्या शेतात आग लागल्याच्या दोन दिवसांनंतर आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी ती विझवण्यापूर्वी सुमारे सहा तास चाललेल्या आगीनंतर, बुधवारी पुन्हा एकदा ताळगावमधील मॉडेल्स लेगसी निवासी संकुलाच्या समोरील शेतात आग लागली, ज्यामुळे धुराचे लोट हवेत पसरले आणि स्थानिक रहिवासी घाबरले.आगीचे कारण कळू शकले नाही. अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाल्या आणि धुराच्या ढगांनी झाकलेल्या आगी विझवल्या.

याबाबत ताळगाव ग्रामपंचायतीचे पंच सदस्य आग्नेलो डीकुन्हा म्हणाले, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात आग लावण्याची परंपरा आहे परंतु त्यांनी हे करताना खबरदारी घेतली पाहिजे. बहुतेक जमिनीचा भाग नापीक असल्याने हे टाळण्यासाठी कोमुनिदादने काहीतरी करावे. आगीमुळे कम्युनिडेड जमीन नष्ट होत आहे.हे एक नियमित वैशिष्ट्य बनले आहे. हे दरवर्षी घडते. तथापि, आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रत्येकजण एकत्रितपणे काम करत आहे,असे ते म्हणाले .

स्थानिक रहिवासी शिवम्मा म्हणाल्या की, या घटनेची माहिती मिळताच मी माझ्या घरी धाव घेतली कारण तिथे गॅस सिलिंडर आहेत. आग आमच्या घराजवळ होती. शेतात पिके घेणारे शेतकरी ती पेटवत आहेत. सुरुवातीला ती शेताच्या एका कोपऱ्यात होती पण हळूहळू ती इतर भागात पसरली. येथे, सुमारे २० लहान घरे आहेत.

सेसिल रॉड्रिग्ज, आणखी एक रहिवासी म्हणाल्या, आज पुन्हा शेतात आग लागली. तथापि, ते लवकर लक्षात आले आणि अधिकारी आले आणि अग्निशमन दलाला बोलावण्यात आले. हे नियमितपणे घडत आहे. या समस्येवर काहीतरी उपाय शोधला पाहिजे. समस्या अशी होती की अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचू शकले नाही कारण ते शेताच्या मध्यभागी होते जे खूप मोठे आहे.

सोमवार, ५ मे २०२५ रोजी,ताळगावमधील कामराभाट येथील कोरड्या गवताच्या शेतात लागलेल्या आगीमुळे आजूबाजूच्या निवासी भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते आणि काही रहिवाशांना त्यांच्या अपार्टमेंटमधून बाहेर पडावे लागले होते. ही आग सकाळी ११:३० च्या सुमारास लागली आणि जवळपासच्या घरांमध्ये आणि फ्लॅटमध्ये धुराचे लोट पसरले. पणजी मुख्यालय, पिळर्ण आणि पर्वरी अग्निशमन केंद्रातील अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पाठवण्यात आल्या होत्या, परंतु शेतात जाण्यासाठी रस्ते उपलब्ध नसल्याने आपत्कालीन कर्मचाऱ्यांना आग पूर्णपणे आटोक्यात आणणे कठीण झाले.

दरम्यान, आणखी एका घटनेत, बुधवारी सकाळी मेरशी मधील साईकृपा हॉटेलजवळ एका सुक्या झाडाला आग लागली, ज्यामुळे पणजी अग्निशमन आणि आपत्कालीन सेवांनी त्वरित मदत केली.

---

# एलईडी मासेमारीबाबत गोवा खंडपीठाचा आज निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** गोव्यातील सागरी हद्दीत एलईडी आधारित मासेमारीच्या विरोधात दाखल याचिकांवरील अंतिम निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाकडून आज (८ मे) रोजी जाहीर केला जाण्याची शक्यता आहे . एलईडी मासेमारीवर बंदी असतानाही ती मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याबाबत याचिकाकर्त्यांनी न्यायालयात आक्षेप घेतला होता. या प्रकरणातील निकाल मागील वर्षी सप्टेंबरमध्ये राखून ठेवण्यात आला होता.

जोकिम रेजिनाल्ड मेंडिस तर १० मच्छीमार आणि गोवा फाउंडेशन या पर्यावरण विषयक संस्थेने एलईडीच्या साहाय्याने होणाऱ्या मासेमारीवर बंदी घालण्याची मागणी करत दोन स्वतंत्र याचिका दाखल केल्या होत्या. यामध्ये, एलईडी मासेमारीमुळे माशांच्या प्रजोत्पादनावर विपरित परिणाम होत असून, शाश्वत मासेमारीस धोका निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले होते.

राज्यातील मत्स्यव्यवसाय संचालनालयाने काही प्रमाणात कारवाई केली असली तरी प्रत्यक्षात ही मासेमारी सुरुच असल्याची बाब याचिकांमध्ये स्पष्ट करण्यात आली. अलीकडेच एलईडी दिव्यांचा वापर करणाऱ्या एका मासेमारी जहाजावर कारवाई करत त्याला ताब्यात घेतल्याची नोंद आहे. पारंपरिक मच्छीमारांच्या म्हणण्यानुसार, एलईडी दिव्यांकडे मोठ्या प्रमाणावर मासे आकर्षित होतात, ज्यामुळे समुद्रकिनाऱ्यालगत मासेमारी करणाऱ्यांच्या जाळ्यात मासे कमी सापडतात. त्यामुळे पारंपरिक मच्छीमारांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा याचिकेत मांडण्यात आला. मत्स्यव्यवसाय संचालनालयाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात असे नमूद करण्यात आले की, १५ ते २३ मीटर लांबीच्या मासेमारी नौकांसाठी ६० ते १५० केव्हीए क्षमतेच्या डिझेल जनरेटर (डीजी सेट) आवश्यक असतात, कारण या नौका प्रादेशिक हद्दीबाहेर अनेक दिवस समुद्रात राहतात. मात्र १५ मीटरपेक्षा लहान नौकांसाठी अशी आवश्यकता नसल्याचेही प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. दुसरीकडे, याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की हे डीजी सेट मुख्यतः एलईडी मासेमारीसाठी लागणाऱ्या उपकरणांसाठीच वापरले जातात. त्यांनी असेही स्पष्ट केले की, प्रादेशिक पाण्याच्या हद्दीत चालणाऱ्या नौकांना अशा डीजी सेटची आवश्यकता नाही, कारण त्या साधारणपणे इंजिन, रेडिओ, विंच यांसारख्या उपकरणांसाठी बॅटरी पुरवठ्यावर अवलंबून राहतात. या पार्श्वभूमीवर, याचिकाकर्त्यांनी न्यायालयाकडे एलईडी मासेमारी करणाऱ्या नौका जप्त करून त्यांची उपकरणे जप्त करण्याची, तसेच संबंधित नौकाचालकांवर गोवा मरीन फिशिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट, १९८० च्या कलम २१ आणि १९७६ च्या कलम १८ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

---

# ग्रामस्थांचा वृक्षतोडीविरोधात निषेध

## ५० पेक्षा अधिक झाडांची कत्तल | बांधकाम परवाना रद्द करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ७ :** कुडतरी येथील ग्रामस्थांनी मायना भागात सुरू असलेल्या एका गृहनिर्माण प्रकल्पामध्ये झालेल्या मोठ्या प्रमाणावरील अनधिकृत वृक्षतोडीचा बुधवारी तीव्र निषेध नोंदवला. या प्रकरणी वन विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांनी सखोल चौकशी करण्याची आणि संबंधित विकासकाचा परवाना त्वरित रद्द करण्याची मागणी केली.

काँग्रेस नेते मोरेनो रिबेलो यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी केवळ १२ झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात ५० पेक्षा अधिक झाडांची कत्तल झाल्याचे ग्रामस्थांच्या पाहणीत स्पष्ट झाले आहे. आम्ही विकासाच्या विरोधात नाही, मात्र तो पारदर्शक पद्धतीने आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सल्लयानंतर व्हायला हवा. येथे पर्यावरणाची गंभीर हानी होत आहे, असे रिबेलो यांनी स्पष्ट केले.

ग्रामस्थांनी वन अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात आली असून, अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी कुडतरी ग्रामपंचायत कार्यालयात देखील तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. जिल्हा पंचायत सदस्य मिशेल रिबेलो, मोरेनो रिबेलो आणि अन्य स्थानिक पंच सदस्यांसह असंख्य ग्रामस्थांनी एकत्र येत, गृहनिर्माण प्रकल्पासाठी दिलेला बांधकाम परवाना तात्काळ रद्द करण्याची मागणी केली. या आंदोलनात ग्रामस्थांनी असेही निदर्शनास आणून दिले की, परवानगी देताना संबंधित पंच सदस्याला सर्व्हेक्षण प्रक्रियेतून वगळण्यात आले होते, जे नियमांचं उल्लंघन आहे.

या पार्श्वभूमीवर कुडतरीचे आमदार अलेक्सो रेजिनाल्डो लॉरेन्को हे देखील पंचायत कार्यालयात हजर होते. त्यांनी सरपंच अल्सिन्हा डिसिल्वा यांना यासंदर्भात आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू करून परवाना रद्द करण्याची सूचना दिली. तसेच, कोणत्याही न्यायालयीन कारवाईसाठी संधी न देता कायदेशीरदृष्ट्या सर्व पावले योग्य प्रकारे उचलावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना सरपंच अल्सिन्हा डिसिल्वा यांनी माध्यमांना सांगितले की, नगर नियोजन विभागाकडून तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतरच पंचायतने परवाना जारी केला होता. मात्र, आता परिस्थितीचा पुनर्विचार करून गरज पडल्यास कायदेशीर मार्गाचा अवलंब करून परवाना रद्द करण्याची प्रक्रिया हाती घेतली जाईल.

दरम्यान, मोरेनो रिबेलो यांनी असा आरोपही केला की, परवाना मिळाल्यानंतरच मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड करण्यात आली असून, यामागील संबंधित विकासकाविरोधात कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. या मागणीनंतर सरपंच, पंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी संयुक्तरित्या घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

---

# वनविभाग मगरींचे सर्वेक्षण आणि मॅपिंग करणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** मगरींनी लोकांवर हल्ला करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने वन विभाग राज्यभर मगरींच्या संख्येचे सर्वेक्षण आणि मॅपिंग करण्याच्या तयारीत आहे. मंगळवारी दाभाळ येथे एका महिलेवर मगरीने हल्ला केल्याच्या घटनेकडे लक्ष वेधत वनमंत्री श्री. विश्वजित राणे यांनी या संदर्भात महत्त्वाची घोषणा केली.

राणे यांनी मंगळवारी सांगितले की, त्यांनी वन अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आहे आणि त्यांना मगरींच्या संख्येचा आणि त्यांच्या वितरणाचा सखोल अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत. आम्ही पावसाळ्याच्या आधी स्थानिक समुदायांना सहभागी करून 'बेडूक वाचवा मोहीम' सुरू करणार आहोत, असे ते म्हणाले.

वन विभाग 'वाघेरी टेकड्या'ला संरक्षित वन म्हणून घोषित करण्याचा विचार करत आहे, तसेच जवळच्या 'म्हादई वन्यजीव अभयारण्याची' सीमा वाढवण्याचेही प्रस्तावित आहे. राणे यांनी या संदर्भात माहिती दिली. तसेच, राणे यांनी टेकडी विक्रीच्या दाव्याचा खंडन केले . त्यांनी सांगितले की, 'अमित राणे' या व्यक्तीविरुद्ध बेकायदेशीर कृत्यांच्या संदर्भात वन विभागाला तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

मंत्री श्री. राणे यांनी वन विभागाच्या आगामी योजना जाहीर केल्या. त्यामध्ये ४८० खाजगी वनांचे दावे लवकरात लवकर तपासणे, बिबट्या आणि भारतीय गौर यांचे सर्वेक्षण करणे, तसेच जंगलातील तुकड्यांचा अभ्यास आणि वाघांच्या कॉरिडॉरची स्थिती तपासणे यांचा समावेश आहे.

याव्यतिरिक्त, वन विभाग राज्यभरातील खारफुटी राखीव म्हणून ३,५५० सर्वेक्षण क्रमांकांची घोषणा करण्याचा विचार करत आहे, तसेच राज्यातील लाकडाच्या गिरण्यांचे ऑडिट करण्याचेही नियोजन आहे. पाणी वाचवण्यासाठी, वन विभाग शाश्वत विकासाच्या दिशेने पाणवठ्यांचे स्वच्छता अभियान राबवण्याच्या तयारीत आहे. राणे यांनी सांगितले की, बोंडला प्राणीसंग्रहालय लवकरच जनतेसाठी पुन्हा उघडले जाईल. आम्ही त्याठिकाणी रोगाचा प्रसार थांबवला आहे. गेल्या एका महिन्यापेक्षा जास्त काळ विषाणूजन्य संसर्गामुळे तीन सिव्हेट मांजरी आणि दोन जंगली मांजरींचा मृत्यू झाल्यामुळे प्राणीसंग्रहालय बंद केले होते, असे ते म्हणाले.